**अवर्षणामुळे बाधित / मराठवाडा व विदर्भातील निवडक जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मत्स्यव्यवसायाकरीता मासळी विक्रीसाठी फिरते वाहन उपलब्ध करुन देणे करिता जिल्हास्तरीय समितीचे कामकाज तसेच योजना संपुष्टात आणण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
शासन निर्णय क्रमांकः मत्स्यवि २०२६/प्र.क्र. ९/पदुम-१३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार इमारत, मुंबई ४०००३२
दिनांक: ११ फेब्रुवारी, २०२६.

**वाचा** :- १) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्र. मत्स्यआ २०१५/प्र.क्र.१४८/पदुम-१२, दि.३०.०७.२०१५
२) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्र. मत्स्यआ २०१५/प्र.क्र.१४८/पदुम-१२, दि.०६.११.२०१८

**प्रस्तावना:-**

अवर्षणामुळे बाधित भागातील शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी मत्स्यव्यवसाय विभागातील अंतर्भूत "मासळी विक्रीसाठी फिरते वाहन उपलब्ध करुन देणे" या योजनेस संदर्भिय क्र.१ येथील दि. ३०.०७.२०१५ च्या शासन निर्णयान्वये शासन मान्यता देण्यात आली असून सदर योजनेसाठी लाभार्थी निवड, योजना अंमलबजावणी व अनुदान वाटप व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे. तसेच संदर्भिय क्र.२ येथील दि.०६.११.२०१८ च्या शासन निर्णयान्वये मराठवाडा व विदर्भातील निवडक जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मत्स्यव्यवसायाकरीता मासळी विक्रीसाठी एकूण १० जिल्ह्यांमध्ये ४४ फिरते वाहन उपलब्ध करुन देण्याच्या योजनेस मान्यता देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील सदर समितीचे कार्य संपुष्टात आल्याने जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीची कार्यकक्षा/कामकाज संपुष्टात आणण्याची बाब तसेच दि.६.११.२०१८ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेल्या योजनेचे उद्दिष्ट पूर्ण झालेले असल्याने सदर योजना देखील संपुष्टात आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

१. अवर्षणामुळे बाधित भागातील शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी मत्स्यव्यवसाय विभागातील अंतर्भूत "मासळी विक्रीसाठी फिरते वाहन उपलब्ध करुन देणे" या योजनेस संदर्भिय क्र.१ येथील दि. ३०.०७.२०१५ च्या शासन निर्णयान्वये शासन मान्यता देण्यात आली असून सदर योजनेसाठी लाभार्थी निवड, योजना अंमलबजावणी व अनुदान वाटप व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीचे कार्य संपुष्टात आल्याने

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीची कार्यकक्षा/कामकाज संपुष्टात आल्याने तसेच पुढील कोणतीही कार्यवाही अपेक्षित नसल्याने यापुढे सदर समितीची कार्यकक्षा/कामकाज संपुष्टात आणण्यात येत आहे व यापुढे सदर समिती अस्तित्वात राहणार नाही.

तसेच दि.०६.११.२०१८ अन्वये निर्गमित मराठवाडा व विदर्भातील निवडक जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मत्स्यव्यवसायाकरीता मासळी विक्रीसाठी एकूण १० जिल्ह्यांमध्ये ४४ फिरते वाहन उपलब्ध करुन देण्याच्या योजनेचे उद्दिष्ट पूर्ण झालेले असल्याने सदर योजना देखील संपुष्टात आणण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२६०२१११८२०१०१७०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

JAKHATE KISHOR MAHADEO

Digitally signed by JAKHATE KISHOR MAHADEO
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Fisheries Department, 2.5.4.20=83112E1445917D0A21FBAB36D7C0FF41E09863C93A2E62EA1B0C01DA16B7A161, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=032A6ACBFD529D66DD76E26EAB14B28C6DD07D2F776E529B44BA2CB45324C503, cn=JAKHATE KISHOR MAHADEO
Date: 2026.02.11 18:21:09 +05'30'

**( कि. म. जकाते )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
२) मा. मुख्यमंत्री महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. मंत्री, मदत व पुनर्वसन यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. राज्यमंत्री, मदत व पुनर्वसन यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. मंत्री, मत्स्यव्यवसाय यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) सचिव, (पदुम), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
७) प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
८) प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
९) सचिव, (मदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११) मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१२) कक्ष अधिकारी, (पदुम-१६), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) जिल्हाधिकारी, औरंगाबाद/जालना/नांदेड/बीड/परभणी/लातूर/उस्मानाबाद/हिंगोली/अमरावती/बुलढाणा/वाशिम/अकोला/यवतमाळ/नागपूर/वर्धा/चंद्रपूर/भंडारा/गोंदिया/गडचिरोली
१४) प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, औरंगाबाद/लातूर/अमरावती/नागपूर
१५) सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, औरंगाबाद/जालना/नांदेड/बीड/परभणी/लातूर/उस्मानाबाद/हिंगोली/अमरावती/बुलढाणा/वाशिम/अकोला/यवतमाळ/नागपूर/वर्धा/चंद्रपूर/भंडारा/गोंदिया/गडचिरोली
१६) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद/जालना/नांदेड/बीड/परभणी/लातूर/उस्मानाबाद/हिंगोली/अमरावती/बुलढाणा/वाशिम/अकोला/यवतमाळ/नागपूर/वर्धा/चंद्रपूर/भंडारा/गोंदिया/गडचिरोली
१७) निवड नस्ती- पदुम १३.